# वेगळीच कविता

गणिताची कविता की कवितेचे गणित
वर्तुळ कलात्मक की अलंकार गुणात्मक
शास्त्राची कला की  कलेचे शास्त्र
अभ्यासाचा खेळ की खेळाचा अभ्यास
गोंधळातून सूटका की सूटकेचा गोंधळ
प्रकाशाचा रंग की रंगचा प्रकाश
नादाची शांतता की शांततेचा नाद
सर्व आपले कि आपण सर्वांचे
एकतेचे वैविध्य की विविधतेत एकता
ठरवून निवडावे की निवडून ठरवावे
शब्दांचे अर्थ आणि निरर्थी शब्द
निरुत्तरी प्रश्नांना नसते उत्तर
बुद्धीला चालना नि भावनांचा मेळ
काव्य रचनेत लागला सत्कारणी वेळ